दाखल तारीख : ०६/०५/२०१४
नोंदणी तारीख : ०६/०५/२०१४
निकाल तारीख : ०९/१०/२०२४
कालावधी : १० व ०५ म ०३ दि.

**पीठासीन अधिकारी, कामगार न्यायालय, क्र. १ कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**( श्रीमती मधुरा आ. मुळीक यांचे समोर )**

**JO Code No. MH-02960**

**संदर्भ(औ.वि.अ.) क्र.२२/२०१४**
**CNR No. MHLC0900-0115-2014**

चंद्ररुप क्लॉथ स्टोअर्स, ... प्रथम पक्षकार
लक्ष्मी रोड, कोल्हापूर.

**विरूध्द**

श्री. तुकाराम बंडोपंत वेल्हाळ, ... द्वितीय पक्षकार.
मु.खोतवाडी, पो. माजगांव, (व्हायाकळे),
ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर.

---

**दावा** -औद्योगिक विवाद अधिनियम, कलम २(अ) अन्वये नोकरीतून कमी केलेल्या तारखेपासून संपूर्ण वेतन व सेवा सलगता व इतर अनुषंगीक फायदयासह पूर्ववत सेवेत पुर्नस्थापीत करणेबाबत.

---

**उपस्थिती :-** विधीज्ञ प्रथम पक्षकार यांचेतर्फे - श्री. डी.एस.जोशी.
विधीज्ञ द्वितीय पक्षकार यांचेतर्फे - श्री. ए.टी. उपाध्ये.

---

## -: अंतिम निवाडा :-

(दिनांक : ०९ ऑक्टोबर २०२४)

अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक ०७/०४/२०१४ रोजीच्या जावक क्रमांक – अकाआ/औ.वि.अ/२-अ.सं/२०७८ आदेशान्वये (निशाणी ओ-१) द्वितीय पक्षकाराने उपस्थित केलेला औद्योगिक विवाद अभिनिर्णयासाठी, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २-अ, १०, १२(५) आणि ३९ च्या तरतुदीप्रमाणे या न्यायालयाकडे संदर्भीत केलेला आहे. सदरच्या आदेशात मा. आयुक्त पुणे यांनी औद्योगिक विवादाच्या स्वरूपाचे वर्णन करुन खालील नमूद अनुसूचीनुसार निर्णय/निवाडा कळविले आहे, सदर अनुसूची खालीलप्रमाणे-

''चंद्ररुप क्लॉथ स्टोअर्स, लक्ष्मीरोड, कोल्हापूरच्या नियोक्त्याने दिनांक १०/०९/२०११ पासून बेकायदेशीरपणे कामावरुन कमी केले आहे किंवा कसे ? असल्यास सदर कामगारास कामावरुन कमी केलेल्या तारखेपासून संपूर्ण वेतन व नोकरीच्या सलगतेसह इतर अनुषंगीक फायद्यासह पूर्ववत व्यवस्थापनाच्या सेवेत दाखल होण्याचा हक्क आहे किंवा कसे ? ''

२. अभिलेखावरुन असे दिसून येते की, अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दि.१६/१०/२०१४ च्या शुध्दीपत्रकाद्वारे द्वितीय पक्षकार यांना कामावरुन कमी केल्याची तारीख १०/०९/२०११ ऐवजी २७/११/२०१२ अशी असल्याचे संदर्भ आदेशात दुरुस्ती केली आहे.

३. वर नमूद संदर्भीत आदेशास अनुसरुन द्वितीय पक्षकार यांना नोटीस काढली असता त्यांनी हजर होवून मागणी पत्र **नि.क्र.यु-३** वर दाखल केले आहे. द्वितीय

पक्षकार यांच्या कथनानुसार प्रथम पक्षकार यांचा कापड विक्रीचा व्यवसाय असून त्यांच्याकडे ५० पेक्षा जास्त कामगार नोकरीस आहेत. त्यामुळे त्यांना औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, किमान वेतन कायदा, बोनस व पी.एफ. इ. कायदे लागू आहेत. द्वितीय पक्षकार दि.०९/१०/२०११ पासून प्रथम पक्षकार यांचेकडे सेल्समन म्हणून कामास लागले. प्रथम पक्षकार यांनी त्यांना आपल्या दुकानात बोलावून इतर ठिकाणापेक्षा रु.१,०००/- दरमहा ज्यादा पगार देतो असे सांगून कामावर बोलावून घेतले. त्यांना रु.६,०००/- दरमहा पगार देण्याचे मान्य केले. त्यांना कामावर हजर करुन घेतल्यानंतर दोन महिन्याच्या पगाराची आगाऊ रक्कम त्यांच्या बॅक खात्यात जमा केली होती. परंतु त्यानंतर त्यांना दरमहा रु.४,०००/- इतका पगार प्रथम पक्षकार देवू लागले. त्याबाबत विचारणा केली असता रु.२,०००/- फरकाची रक्कम वर्षाअखेरीस देवू असे तोंडी सांगितले. द्वितीय पक्षकार नोकरीत असताना त्यांचे मानसिक संतुलन बिघडवण्याचा प्रयत्न प्रथम पक्षकार यांनी केला. त्यांच्याकडून इतरही कामे करुन घेतली. त्यांना कामावर हजर होताना लेखी आदेश दिलेला नव्हता व विक्री केलेल्या मालावर १% प्रमाणे इंन्सेंन्टीव्ह देण्याचे तोंडी मान्य केले होते. परंतु, त्याप्रमाणे त्यांना एका महिन्यानंतर इंन्सेंनटीव्ह दिला नाही. द्वितीय पक्षकार यांनी प्रथम पक्षकार यांचेकडे सलग २४० दिवसांपेक्षा अधिक दिवस एका वर्षात काम केले आहे. द्वितीय पक्षकार यांना प्रथम पक्षकार यांनी दि.२७/११/२०१२ पासून तोंडी आदेशाने सेवेतून कमी केल्यानंतर त्यांनी प्रथम पक्षकार भागीदारांना प्रत्यक्ष जाऊन भेटून कामावर येण्याची विनंती केली. परंतु, प्रथम पक्षकार भागीदार यांनी कामाची गरज नसल्याचे सांगून त्यांना परत पाठविले. द्वितीय पक्षकार यांना नाईलाजाने औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम २(अ) अन्वये प्रथम पक्षकार यांना मागणी नोटीस पाठवून औद्योगिक विवाद उपस्थित करावा लागला. सरकारी कामगार अधिकारी तथा समेट

अधिकारी यांचेपुढे व्यवस्थापनाच्या असहकार्याच्या धोरणामुळे तडजोड झाली नाही. त्यामुळे सदरचा विवाद पुढील कारवाई करीता या न्यायालयात आलेला आहे.

४. द्वितीय पक्षकार यांचे असे कथन आहे की, त्यांना सेवेतून कमी करताना औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम २५-फ च्या तरतूदींचे पालन केलेले नाही. त्यांना आरोपपत्र देवून खातेनिहाय चौकशी केलेली नाही. कायदयाच्या कोणत्याही तत्वांचे पालन न करता त्यांना सेवेतून तोंडी आदेशाने कमी केलेले आहे. द्वितीय पक्षकार यांना किमान वेतन कायदयानुसार हजेरी कार्ड दिले जात नव्हते. प्रथम पक्षकार यांनी समेट कारवाईत त्यांना कामावर घेणेस तयार आहे असे कथन केले होते तरी प्रत्यक्षात ते कामावर हजर होण्यास गेले असता त्यास हजर करुन घेतले नाही. तसेच मधल्या काळातील पगार देण्यास नकार दिला. द्वितीय पक्षकार यांना सेवेतून कमी केल्यानंतर प्रयत्न करुनही कोठेही नोकरी मिळालेली नाही. त्यांना सुडबुध्दीने, बेकायदेशीरपणे व अधिकाराचा दुरुपयोग करुन सेवेतून कमी केले आहे. तरी त्यांची नोकरी सलग धरुन मधल्या काळातील सर्व पगार देवून व अन्य आर्थिक फायदे देवून पूर्ववत सेल्समन म्हणून कामावर हजर करुन घेण्याचा आदेश प्रथम पक्षकार यांना दयावा व त्यांचा ठरलेला पगार दरमहा रु.६,०००/- प्रमाणे देण्याचा व मधल्या काळातील पगाराच्या फरकाची रक्कम त्यानुसार अदा करण्याचा आदेश, तसेच खर्चापोटी रु.५०,०००/- देण्याचा आदेश प्रथम पक्षकार यांच्याविरुध्द व्हावेत, अशी विनंती द्वितीय पक्षकार यांनी केलेली आहे.

५. प्रथम पक्षकार यांनी प्रस्तुत प्रकरणी हजर होवून लेखी कैफियत **नि.क्र.सी-२** वर दाखल करुन द्वितीय पक्षकार यांच्या मागणी पत्रातील सर्व कथने नाकारलेली आहेत. प्रथम पक्षकार यांच्या कथनांनुसार त्यांच्याकडे सुमारे ३७ कामगार काम करतात. द्वितीय पक्षकार हे तात्पुरते कामगार म्हणून कामास लागले व त्यांना

ठरलेल्या दराप्रमाणे त्यांच्या अल्प सेवेच्या काळात वेतन दिले आहे. द्वितीय पक्षकार दि.२७/११/२०१२ पासून विना परवाना गैरहजर राहिल्याने प्रथम पक्षकार यांनी त्यांना दि.०८/०४/२०१३ रोजी कामावर हजर राहण्याकरीता पत्र पाठविले होते व त्याची प्रत त्याच दिवशी सरकारी कामगार अधिकारी यांना दिली. द्वितीय पक्षकार यांनी त्याची दखल घेवूनही कामावर आले नाहीत अथवा त्या पत्रास उत्तर दिले नाही. त्यांनी दि.०५/०८/२०१३ रोजी सहाय्यक कामगार आयुक्त, कार्यालयास पत्र पाठवून बेजबाबदार व असंबंध पैशाची मागणी केली. त्यामध्ये नोकरी व तिची सलगता वगैरेची मागणी नाही तर नोकरी करावयाची नाही असे समजून तथाकथीत अंतिम देणी मागितली. ती मिळणार नाहीत हे दिसल्यावर दि.११/०९/२०१३ रोजी खोटया मजकुराची मागणी नोटीस पाठविली. प्रथम पक्षकार यांनी त्यास उत्तर देवून द्वितीय पक्षकार यांना कामावर येण्याची सूचना केली. तथापि, ते कामावर हजर झाले नाहीत. सरकारी कामगार अधिकारी यांचेसमोर झालेल्या कारवाईमध्ये दि.११/११/२०१३ रोजी प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना कामावर येण्याची सूचना केली. तथापि, त्यांनी ती नाकारली. प्रथम पक्षकार यांनी पुन्हा दि. ०९/१२/२०१३ रोजी द्वितीय पक्षकार यांना कामावर येण्याची सूचना केली व त्यांची सेवा सलग आहे असेही कथन केले. तथापि, द्वितीय पक्षकार यांनी ही मागणी नाकारली आहे. त्यामुळे त्यांना आता कोणतीही मागणी करता येणार नाही. प्रथम पक्षकार यांनी दि.१०/१२/२०१३ रोजी पत्र पाठवून त्यांना कामावर येण्याची सूचना केली तथापि ते आले नाहीत. द्वितीय पक्षकार यांनी व्यवस्थापनाच्या एकाही पत्रास उत्तर दिले नाही. द्वितीय पक्षकार हे वर नमूद पत्रांचा व सरकारी कामगार अधिकारी यांचेसमोरील कारवाईचा जाणीवपूर्वक उल्लेख टाळत आहेत व याबाबी न्यायालयापासून लपवून ठेवत आहेत. द्वितीय पक्षकार यांना प्रथम पक्षकार यांचेकडून पैसे उकळण्याचे आहेत हे स्पष्ट होते. द्वितीय पक्षकार आतासुध्दा कामावर

रुजू होवू शकतात. त्यांनी २४० दिवस काम केले ही बाब चुकीची आहे. त्यांना दि.२७/११/२०१२ रोजी कामावरुन कमी केलेले नाही व त्यांनी खोटा विवाद उपस्थित केला आहे. त्यांच्या हट्टी व कामावर न येण्याच्या धोरणामुळे विनाकारण प्रस्तुतचा विवाद या न्यायालयात संदर्भीत झालेला आहे. प्रथम पक्षकार यांनी औद्योगिक विवाद कायदा, १९४७ चे कलम २५-फ चे पालन करण्याचे कोणतेही कारण नाही. द्वितीय पक्षकार यांना तोंडी अगर कोणत्याही आदेशाने कमी केलेले नाही. ते कामावर हजर राहण्यास कधीही आले नाहीत. त्यांना काम करण्याकरीता कोल्हापूर येथे भरपूर दुकाने व काम उपलब्ध आहे. द्वितीय पक्षकार यांनी चुकीची मागणी केलेली आहे त्यामुळे प्रस्तुतचा संदर्भ फेटाळून लावण्याची विनंती प्रथम पक्षकार करीत आहे.

६. दोन्ही बाजूंच्या परस्पर विरुध्द कथनांवरुन माझे सन्माननीय पूर्वपिठासीन अधिकारी यांनी वाद मुद्दे **नि.क्र.ओ-६** वर निश्चित केलेले आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे -

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथम पक्षकाराने द्वितीय पक्षकारास दिनांक २७/११/२०१२ रोजी बेकायदेशीररित्या कामावरुन कमी केले, असे ते सिध्द करतात काय ? | **नकारार्थी.** |
| २. | दि.२७/११/२०१२ पासून द्वितीय पक्षकार स्वत:हून कामावर गैरहजर असल्याचे प्रथम पक्षकाराने सिध्द केले आहे काय ? | **होकारार्थी.** |
| ३. | द्वितीय पक्षकार सेवेची सलगता व मागील पूर्ण | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | पगारासह कामावर घेतले जाण्यास पात्र ठरतो काय ? | |
| ४. | काय आदेश ? | **प्रस्तुतचा संदर्भ नामंजूर करण्यात येत आहे.** |

**-: कारणमीमांसा :-**

७. द्वितीय पक्षकार यांनी त्यांची कथने सिध्द करण्याकरीता स्वत:ची साक्ष **नि.क्र.यु-१६** च्या शपथपत्रान्वये नोंदवली आहे. परंतु कथनापुष्ठ्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा न देता **नि.क्र.यु-१७** पुरावा बंद पुरसीस दाखल केलेली आहे.

८. प्रथम पक्षकार यांनी त्यांच्या कथनापुष्ठयर्थ श्री.दत्तात्रय गोपाळराव कामत यांची साक्ष **नि.क्र.सी-३** च्या शपथपपत्राने नोंदवली आहे. प्रथम पक्षकार यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा न दाखल करता **नि.क्र.सी-१७** पुरसीस अन्वये पुरावा बंद केला आहे.

९. द्वितीय पक्षकार यांचेतर्फे सन्माननीय विधिज्ञ.श्री.ए. टी. उपाध्ये व प्रथम पक्षकार यांचेतर्फे विधिज्ञ श्री.डी. एस. जोशी यांचा युक्तीवाद ऐकला. दोंन्ही बाजूचे पक्षकार संदर्भ आदेश **नि.ओ-१** सोबत या न्यायालयास प्राप्त झालेल्या कागदपत्रांवर अवलंबून आहेत.

**मुद्दा क्र. १ ते ४ करीता :-**

१०. सदरचे मुद्दे परस्परांवर अवलंबीत असल्याने एकत्रीतरीत्या चर्चीले आहेत. सदरचे मुद्दे हे प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना दि.२७/११/२०१२ रोजी बेकायदेशीररित्या कामावरुन कमी केले आहे किंवा द्वितीय पक्षकार स्वत:हून

दि.२७/११/२०१२ पासून कामावर गैरहजर आहेत ? व द्वितीय पक्षकार सेवेची सलगता व मागील काळातील संपूर्ण पगारासह कामावर घेण्यास पात्र आहेत का ? याबाबतची आहेत. द्वितीय पक्षकार यांचेवर त्यांची कथने सिध्द करण्याची प्राथमिक जबाबदारी आहे. अभिलेखावरुन असे दिसून येते की, द्वितीय पक्षकार यांनी त्यांच्या कथनापुष्ठयर्थ स्वत:ची साक्ष **नि.क्र.यु-१६** च्या शपथपत्रान्वये नोंदवली आहे. द्वितीय पक्षकाराने त्यांच्या मागणी पत्रातील सर्व कथने पुर्नउच्चारीत केलेली आहेत.

११. द्वितीय पक्षकार यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, या न्यायालयास संदर्भ आदेशाच्या बाहेर जाऊन न्यायनिर्णय करता येणार नाही त्यामुळे प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना दि.२७/११/२०१२ रोजी बेकायदेशीररित्या कामावरुन कमी केले याबाबत न्यायनिर्णय होणे आवश्यक आहे. असाही युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना कामावरुन कमी करताना औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ कलम २५-फ ची पुर्तता न करता तोंडी आदेशाने कमी केलेले आहे. द्वितीय पक्षकार जर कामावर गैरहजर राहिले होते तर त्याबाबत चौकशी करण्याची जबाबदारी प्रथम पक्षकार यांची होती. द्वितीय पक्षकार हे कामावर गैरहजर राहीले व त्यांनी स्वत:हून नोकरी सोडली हा प्रथम पक्षकार यांचा बचाव अस्वीकाहार्य आहे कारण प्रथम पक्षकार यांनी त्याबाबत द्वितीय पक्षकार यांचेवर कोणतीही कारवाई केलेली नाही. प्रथम पक्षकार यांच्या साक्षीदाराने द्वितीय पक्षकार यांना कधीही कामावर हजर केलेले नाही अशी साक्ष दिलेली आहे. त्यामुळे त्यांना कामावरुन बेकायदेशीररित्या कमी केल्याचे सिध्द होत आहे. द्वितीय पक्षकार यांचेतर्फे असाही युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना कामावरुन कमी केल्यानंतर प्रयत्न करुनही त्यांना इतरत्र नोकरी मिळाली नाही. तसेच द्वितीय पक्षकार हे इतरत्र नोकरीस होते ही बाब प्रथम पक्षकार यांनी सिध्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे ते

मधल्या काळातील संपूर्ण वेतन मिळणेस पात्र आहेत. याविरुध्द, प्रथम पक्षकार यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, द्वितीय पक्षकार यांना वेळोवेळी नोटीसा देवून तसेच सरकारी कामगार अधिकारी तथा समेट अधिकारी यांचेसमोर अर्ज देवून कामावर हजर राहण्याबाबत कळविले असतानाही ते कामावर हजर राहीले नाहीत. प्रस्तुतचे प्रकरण प्रलंबीत असतानाही त्यांना कामावर येणेबाबत प्रथम पक्षकार यांनी पुरसीस दाखल केल्यानंतर ते आल्याने त्यांना कामावर हजर करुन घेतलेले आहे. द्वितीय पक्षकार यांना कधीही नोकरीची गरज नव्हती त्यामुळे वेळोवेळी सांगूनही ते कामावर हजर झालेले नाहीत. प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना कधीही कामावरुन कमी केलेले नसल्याने प्रस्तुतचा संदर्भ नामंजूर करण्यात यावा, असा युक्तीवाद प्रथम पक्षकार यांनी केला.

१२. द्वितीय पक्षकार यांच्या कथनानुसार त्यांना प्रथम पक्षकार यांनी दि.२७/११/२०१२ रोजी कायदयातील तरतूदींचे पालन न करता, बेकायदेशीररित्या तोंडी आदेशाने कमी केले आहे. याउलट, प्रथम पक्षकार यांच्या कथनांनुसार द्वितीय पक्षकार हे स्वत:हून कामावर गैरहजर होते व प्रथम पक्षकार यांनी त्यांना कधीही कामावरुन कमी केलेले नव्हते. द्वितीय पक्षकार यांनी त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात ही बाब नमुद केलेली आहे. अभिलेखावरुन असे दिसून येते की, त्यांना कामावरुन तथाकथीतरित्या कमी केल्याच्या तारखेनंतर जवळपास ९ महिन्यानंतर प्रथमत: त्यांनी दि.०६/०८/२०१३ रोजी प्रथम पक्षकार यांचेविरुध्द कारवाई होण्याकरीता सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर यांना अर्ज दिला होता. सदर अर्जामध्ये त्यांनी त्यांना कामावर रुजू करुन घ्यावे असे कोठेही नमूद केलेले नाही परंतु केवळ अर्जासोबत दिलेल्या हिशोबानुसार माहे ऑक्टोबर-२०११ ते जुलै-२०१३ पर्यंतचा पगार, फंडाची रक्कम व उपदानाची रक्कम देणेबाबत अर्ज

केलेला होता. त्यानंतर त्यांनी दि.११/०९/२०१३ रोजी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम २-ए प्रमाणे प्रथम पक्षकार यांनी नोटीस देवून त्यांना बेकायदेशीररित्या कामावरुन कमी केल्याचे व मागील सेवा सलग धरुन त्वरीत कामावर हजर करुन घ्यावे तसेच मधील काळातील पगाराचा फरक दयावा अशी विनंती केली होती. तद्पूर्वी, दरम्यानच्या काळात दि.०८/०४/२०१३ रोजी प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना ते दि.२७/११/२०१२ पासून सलग व सतत विनापरवाना गैरहजर आहेत व त्यांना काम करण्याची इच्छा असल्यास त्वरीत गैरहजेरीच्या खुलाशासह कामावर हजर राहावे, तसेच या काळात द्वितीय पक्षकार यांना वेळोवेळी कामावर येण्याविषयी फोनवर सूचना दिली होती परंतु त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही असे कळविले होते. सदर कलम २-ए प्रमाणे नोटीस व दि.०८/०४/२०१३ रोजीचे प्रथम पक्षकार यांनी पाठविलेले पत्र अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी संदर्भ आदेशासोबत समेट अधिकारी यांचेसमोर झालेल्या कारवाईतील या न्यायालयाकडे वर्ग केलेल्या कागदपत्रांमध्ये आहेत. द्वितीय पक्षकार यांनी त्यांच्या उलटतपासात प्रथम पक्षकार यांनी त्यांना दि. ०८/०४/२०१३ रोजी कामावर येण्याकरीता नोटीस पाठविल्याचे मान्य केलेले आहे. त्यांच्या उलटतपासातून ही बाब समोर आली आहे की, दि.०६/०८/२०१३ रोजी त्यांनी कामगार अधिकारी यांना अर्ज दिला होता व सदर अर्जात त्यांना कामावरुन कमी केल्याची तारीख नमूद केलेली नव्हती. असे दिसून येते की, दि.२७/११/२०१२ रोजी द्वितीय पक्षकार यांना कोणी तोंडी आदेशाने कामावरुन कमी केले व त्याकरीता कोणते कारण घडले याबाबतचा उल्लेख द्वितीय पक्षकार यांनी त्यांच्या मागणीपत्रात अथवा पुराव्याच्या शपथपत्रात केलेला नाही.

१३. अभिलेखावरील कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, द्वितीय पक्षकार यांनी कलम २-ए प्रमाणे पाठविलेल्या नोटीसीनंतर त्यांनी उपस्थित केलेला विवाद समेट कारवाईत दाखल करुन घेतला होता. सरकारी कामगार अधिकारी, कोल्हापूर यांचेसमोर चाललेल्या समेट कारवाईत दि.११/११/२०१३ रोजी द्वितीय पक्षकार यांना कामावर हजर होणेसाठी प्रथम पक्षकार यांनी पत्र देवून त्यांचा राहीलेला पगार घेवून जा असे सांगितले होते. तद्नंतरही, दि.०९/१२/२०१३ रोजीच्या कारवाईत त्यांना मागील सेवा सलग धरुन पूर्ववत कामावर घेतले जाईल असे कथन प्रथम पक्षकार यांनी केले होते. परंतु, ते कामावर नसतानाच्या काळातील पगार त्यांना देता येणार नाही अशी भूमिका प्रथम पक्षकार यांनी घेतली होती. त्यावर द्वितीय पक्षकार पूर्ववत कामावर घेवून मागील सेवा सलग धरुन मागील वेतन देण्यात यावे या भूमिकेवर ते ठाम राहीले त्यामुळे प्रकरण असफल नोंदवून बंद करण्यात आले.

१४. प्रथम पक्षकार यांचेतर्फे साक्षीदार श्री. दत्तात्रय गोपाळराव कामत यांनी प्रथम पक्षकारांच्या लेखी कैफियतीप्रमाणे साक्ष **नि.क्र.सी-३** वर नोदंवलेली आहे. साक्षीदार कामत यांच्या उलटतपासातून ही बाब समोर आली आहे की, द्वितीय पक्षकार यांना कामास लागण्यापूर्वी लेखी आदेश दिला नव्हता. द्वितीय पक्षकार हे दि.२७/११/२०१२ पासून कामावर गैरहजर आहेत. ते कामावर गैरहजर असल्याबाबत त्यांना दि.०८/०४/२०१३ रोजी पत्र पाठविले आहे. प्रथम पक्षकार यांनी पाठविलेल्या पत्राला त्यांनी उत्तर दिलेले नाही. द्वितीय पक्षकार कामावर गैरहजर असलेबाबत त्यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी केलेली नाही. ते कामावर येत नसल्याने प्रथम पक्षकार यांनी हजेरी पत्रकातील त्यांचे नाव कमी केले आहे. द्वितीय पक्षकार यांनी स्वत:हून नोकरी सोडल्याने हजेरी पत्रकातील त्यांचे नाव कमी करण्यात आले आहे. साक्षीदार कामत यांचा उलटतपास या पण मुद्दयांवर घेण्यात

आला की, समेट कारवाई चालू असताना द्वितीय पक्षकार हे कामावर हजर होणार होते परंतु प्रथम पक्षकार यांनी त्यास कामावर हजर करुन घेतले नाही, त्यांना ज्यादा पगार देतो असे सांगून प्रथम पक्षकार यांनी कामावर बोलवून घेतले होते, त्यांनी २४० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम केले आहे. परंतु त्यास नकारार्थी उत्तरे साक्षीदाराने दिलेली आहेत. साक्षीदार श्री. कामत यांच्या साक्षीतील त्यांनी श्री. वेल्हाळ यांना कधीही कामावर हजर केले नाही या वाक्यावर द्वितीय पक्षकारातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की तो कामावर हजर राहणेस गेला होता पण त्यास हजर करुन घेतले नाही. असे दिसून येते की, या कथनापुष्ठयर्थ द्वितीय पक्षकाराने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१५. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, प्रथम पक्षकार यांनी त्यांना तथाकथीतरित्या कामावरुन कमी केल्यानंतर दि.०६/०८/२०१३ चे पत्र सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर यांना व कलम २-ए अन्वये नोटीस देईपर्यंत त्यांना बेकायदेशीररित्या कामावरुन कमी केल्याबाबत तसेच ते कामावर हजर राहण्यास गेले असता त्यांना कामावर रुजू करुन घेतले नाही याबाबत प्रथम पक्षकार यांना कळविलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत कामी दाखल केलेला नाही. याउलट, प्रथम पक्षकार यांनी दि.०८/०४/२०१३ रोजी द्वितीय पक्षकार कामावर गैरहजर असल्याचे व कामावर हजर राहणेबाबत लेखी कळविल्याचे दिसून येत आहे. द्वितीय पक्षकाराने त्याच्या कथनापुष्ठयर्थ केवळ तोंडी पुरावा दाखल केलेला असून अभिलेखावर असा कोणताही कागदोपत्री अथवा परिस्थितीजन्य पुरावा दाखल नाही की, ज्यावरुन हे सिध्द होईल की, दि.२७/११/२०१२ रोजी द्वितीय पक्षकारास प्रथम पक्षकार यांनी बेकायदेशिररित्या कामावरुन कमी केले होते. वर नमूद विवेचनावरुन हे सिध्द

होते की, दि.२७/११/२०१२ रोजी प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना कधीही कामावरुन कमी केले नव्हते परंतु ते विनाकारण कामावर गैरहजर राहिले होते. द्वितीय पक्षकार यांचेतर्फे त्यांच्या गैरहजेरीबाबत खातेनिहाय चौकशी न घेतल्याचा युक्तीवाद करण्यात आला. त्याकरीता द्वितीय पक्षकाराने ***डी.के.यादव विरुध्द मे. जे. एम. ए. इंडस्ट्रीज लि., १९९३, (६७) एफ.एल.आर १११ (सुप्रीम कोर्ट)*** या मार्गदर्शक न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. या प्रकरणामध्ये संबंधीत कर्मचाऱ्यास नैसर्गिक न्यायातत्वास अनुसरुन बचावाची संधी न देता गैरहजेरीच्या गैरकृत्याकरीता कामावरुन बडतर्फ करण्यात आलेले होते. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने त्याचा बडतर्फीचा आदेश रद्दबातल ठरवलेला होता. प्रस्तुतच्या प्रकरणात द्वितीय पक्षकार यांना गैरहजेरीच्या गैरकृत्याबबात कामावरुन प्रथम पक्षकार यांनी बडतर्फ केलेले नाही. तर त्यांनी बडतर्फीचा तोंडी आदेश आव्हांनीत केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत मार्गदर्शक न्यायनिर्णयातील न्यायतत्व प्रस्तुत प्रकरणास लागू होत नाहीत. द्वितीय पक्षकार यांनी त्यांचे गैरहजेरीबाबत पाठविलेल्या पत्रास उत्तर न देता प्रथम पक्षकार यांना कलम २-ए ची नोटीस पाठवून औद्योगिक विवाद उपस्थित केल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रथम पक्षकार यांनी त्यांची गैरहजेरीबाबत चौकशी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

१६. प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख काळजीपूर्वक तपासला असता असे दिसून येते की, प्रथम पक्षकार यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये द्वितीय पक्षकार आतासुध्दा कामावर रुजू होवू शकतात असे कथन केलेले आहे. सुरवातीस द्वितीय पक्षकारास प्रस्तुत प्रकरणी पुरावा दाखल करण्याची संधी देवूनही तो दाखल न केल्याने त्याचा पुरावा सन २०१७ मध्ये बंद करण्यात आला. त्यानंतर प्रथम पक्षकार यांनी त्यांच्या साक्षीदाराचे शपथपत्र लगेचच दाखल केले. द्वितीय पक्षकार यांनी या साक्षीदाराचा

उलटतपास सन २०२४ मध्ये पुर्ण केला. त्यानंतर प्रकरण अंतिम युक्तीवादास नेमले असता त्यांनी पुरावा दाखल न केल्याचे द्वितीय पक्षकार यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पुरावा दाखल करण्याकरीता संधी मागितली व तशी संधी त्यांना देण्यात आली. द्वितीय पक्षकाराने सन २०२४ मध्ये त्याचा पुरावा दाखल केला यावरुन तो सदर प्रकरणाबाबत गंभीर नव्हता हे निदर्शनास येते. दरम्यानच्या काळात प्रथम पक्षकाराने **नि.सी–६** वर पुरसीस दाखल करुन द्वितीय पक्षकार यांनी त्यांचे पदावर त्वरीत रुजू होण्यास प्रथम पक्षकाराची हरकत नसल्याचे कथन केले. त्यानंतर द्वितीय पक्षकार हे प्रथम पक्षकार यांच्या सेवेत रुजू झाल्याचे दिसून येते.

१७. द्वितीय पक्षकार यांचेतर्फे सन्माननीय विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, त्यास प्रथम पक्षकार यांनी कामावर घेतल्यामुळे आता त्यांना सेवेत पुर्नस्थापीत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु, सेवेतून बडतर्फ केल्यापासून ते सेवेत रुजू होईपर्यंतच्या काळातील वेतन मिळण्यास ते पात्र आहेत. द्वितीय पक्षकार यांना सध्या किमान वेतन कायदयाप्रमाणे वेतन दिले जात नाही व त्यांना मधल्या काळातील वेतन किमान वेतन दराने अदा करण्याचे आदेश प्रथम पक्षकार यांचेविरुध्द व्हावेत असा युक्तीवाद केला गेला. याउलट, प्रथम पक्षकार यांचेतर्फे सन्माननीय विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, द्वितीय पक्षकार यांना वेळोवेळी कामावर बोलवूनही ते कामावर हजर झाले नाहीत. त्यामुळे ते कोणत्याही अनुतोषास पात्र नाहीत. या मुद्दयांवर प्रथम पक्षकार यांनी खालील मार्गदर्शक न्यायनिवाडयांचा आधार घेतला आहे.

१८. ***सोनल गारमेंटस वि. त्रिबंक शंकर कर्वे, २००३ (१) एल.एल.एन ९१***, या न्यायनिर्णयात मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, संबंधीत कामगारास याचिकाकर्त्यांनी सेवेत पुर्नस्थापीत करण्याचा प्रस्ताव दिलेला

असतानाही तो स्वीकारला नसल्याने सदर कर्मचारी सेवेत पुर्नस्थापीत होण्यास व मधल्या काळातील वेतन मिळण्यास पात्र नाही. त्याचे वर्तन नियोक्त्याच्या भूमिकेस समर्थन देते की, त्याने नोकरी सोडली होती व तो कधीही नोकरीत हजर होण्यास परत आला नाही. मा. उच्च न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, जेव्हा नियोक्ता विवादाच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कामगाराला सेवेत पुर्नस्थापीत होण्याचा प्रस्ताव देतो आणि जर कामगाराने त्याच्या विवादांचा हक्क अबाधीत ठेवून प्रस्ताव स्वीकारला नाही तर त्याला सेवेत पुर्नस्थापीत होण्याचा व मधलया काळातील वेतन मागणारा दावा करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. त्याने प्रथमत: प्रस्ताव स्वीकारुन सेवेत पुर्नस्थापीत झाले पाहीजे व त्यानंतर मधल्या काळातील वेतनाबाबत दावा सुरु ठेवला पाहिजे. सदर प्रकरणात संबंधीत कामगारास दिलेला प्रस्ताव त्याने स्वीकारला नाही त्यामुळे त्याचा संपूर्ण वेतनासह सेवेत सेवेत पुर्नस्थापीत होण्याचा अधिकार राहात नाही असे मा. उच्च न्यायालयाने न्यायनिर्णयीत केलेले आहे.

१९. प्रथम पक्षकार हे ***आर.के. किचन इक्वीपमेंटस्, मुंबई विरुध्द माजीद युसूफ हुरापे व इतर, २००३ II सी.एल.आर. ७९४***, या मार्गदर्शक न्यायतत्वावर अवलंबून आहेत. सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी असे निरीक्षण नोंदवले आहे की, संबंधीत कर्मचाऱ्यास वेळोवेळी विनंती करुनही त्याने मधल्या काळातील वेतन दिले नसल्याचा कारणास्तव सेवेत रुजू होण्यास नकार दिला त्यामुळे तो मधल्या काळातील वेतन मिळण्यास पात्र नाही.

२०. प्रथम पक्षकार हे ***एक्सट्रूयूजन प्रोसेसेस लि. वि. राजेंद्र ए. साव व इतर, २००४ II सी.एल.आर ९८१*** या मार्गदर्शक न्यायतत्वांवर आधारीत आहे. या प्रकरणात समेट अधिकाऱ्यासमोर संबंधीत कामगारास सेवेतून काढून टाकण्यात

आले नव्हते व त्याने पुन्हा काम सुरु करावे अशी भूमिका त्याच्या नियोक्त्याने केली होती. तसेच न्यायालयासमोरही लेखी कैफियतीमध्ये त्यास कामावरुन कमी केले नसल्याचे नमूद केले होते. अशा परिस्थितीत कामगार न्यायालयाने कामगाराविरुध्द अनुशासनात्मक कारवाई न केल्याबाबत काढलेले निष्कर्ष प्रतिकूल असल्याचे नमूद करुन कामगाराच्या बाजूने दिलेला निर्णय रद्दबातल ठरविला आहे.

२१. अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन ही बाब सिध्द होते की, प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकारास कामावरुन कधीही कमी केलेले नव्हते व ते स्वत:हून कामावर गैरहजर राहीले. प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना कामावर रुजू होणेबाबत वेळोवेळी पत्रे पाठवून, समेट अधिकाऱ्यांसमोरील कारवाईत तसे निवेदन देवून व लेखी कैफियतीमध्ये त्यांना कामावर घेण्याबाबत कथन करुनही ते कामावर हजर राहीले नसल्याचे स्पष्ट होत आहे. द्वितीय पक्षकार यांनी अशी साक्ष दिली आहे की, ते दि.२५/११/२०२१ रोजी प्रथम पक्षकार यांचेकडे कामावर रुजू झाले आहेत. परंतु, प्रस्तुतचे प्रकरण प्रलंबीत असताना सन २०१७ पासून कामावर आहे असे कथन **नि.क्र.यु–१५** वरील अर्जात नमूद केलेले आहे. असे दिसून येते की, द्वितीय पक्षकार सध्या प्रथम पक्षकार यांच्या सेवेत आहेत. प्रथम पक्षकार यांनी ज्या मार्गदर्शत न्यायनिवाडयाचा आधार घेतला त्यातील निरीक्षणे प्रस्तुत प्रकरणास तंतोतंत लागू होतात. द्वितीय पक्षकार यांना प्रथम पक्षकार यांनी बेकायदेशीररित्या कामावरुन कमी केल्याचे सिध्द झाले नसल्याने व सन २०१३ पासून वेळोवेळी कामावर हजर राहणेबाबत कळवूनही ते कामावर हजर राहीले नसल्या कारणाने ते त्यांनी मागणी केल्याप्रमाणे कोणत्याही अनुतोषास पात्र नाहीत. वर नमुद विवेचनावरुन द्वितीय पक्षकार यांची मागणी नामंजूर होण्यास पात्र असल्याच्या मतास मी आले आहे. करीता, मुद्दा क्र.१ व ३ चे उत्तर नकारार्थी, मुद्दा क्र. २ चे उत्तर

होकारार्थी देण्यात येवून मुद्दा क्र. ४ च्या उत्तरात खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे. प्रस्तुतचा संदर्भ नामंजूर करण्यात येत आहे.

**-: <u>निवाडा</u> :-**

१. प्रस्तुतचा संदर्भ नामंजूर करण्यात येत आहे.

२. सदर निवाड्याच्या प्रती अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठवावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

LABOUR COURT MAHARASHTRA

Digitally signed by MADHURA ABASAHEB MULIK
Date: 2024.10.11 15:00:42 +0530

दिनांक – ०९/१०/२०२४
ठिकाण – कोल्हापूर.

(मधुरा आ. मुळीक)
पीठासीन अधिकारी तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र.१, कोल्हापूर.

युक्तीवाद ऐकला दिनांक – ०५/१०/२०२४
आदेशाचे टंकलेखन दिनांक – ०९/१०/२०२४
आदेश तपासणी व स्वाक्षरी – १०/१०/२०२४.